# मुद्दा क्रमांक- 17

## इतर माहिती

प्रशासन विभागामार्फत अर्थसहाय्य वाटप अथवा अनुदान वाटप केले जात नाही तथापी मनपा आस्थापनेवर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील शिकाऊ उमेदवारांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण उपलब्ध करुन दिले जाते. तसेच महानगरपालिकेतील कर्मचा-यांना त्यांची शैक्षणिक अर्हता वाढविणारे कोर्सेस पुर्ण करणेसाठी सवलती व फायदे दिले जातात. त्याची माहिती खालीलप्रमाणे

**अ) शिकाऊ उमेदवार नेमणूकांबाबत**

शिकाऊ उमेदवार अधिनियम 1961 अंतर्गत मनपा आस्थापनेवर शिकाऊ उमेदवारांच्या नेमणूका केल्या जातात. मा.संचालक शिक्षूप्रशिक्षण मंडळ भारत सरकार सायन मुंबई 22 यांच्या कार्यालयामार्फत एकुण 4 व्यवसायांच्या 25 जागा मजूर केलेल्या आहेत (कनिष्ठ अभियंता स्थापत्य कनिष्ठ अभियंता विद्यूत) सदरच्या उमेदवारांना शासनाने निर्धारीत केले प्रमाणे विद्यावितेन मनपातर्फे दिले जाते व अदा केलेल्या विद्यवेतनाचे 50% रक्कम वरील कार्यालयाकडून म.न.पा.स प्रतिपुर्ती करुन मिळते.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोर्स केलेल्या उमेदवारांना त्यांच्या व्यवसायाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी मनपामध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूका केल्या जातात. **मा.अंशकालिन प्राचार्य मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड पुणे 411019** यांचे कार्यालयामार्फत एकुण 12 व्यवसायांच्या 236 जागा मंजूर केलेल्या आहेत. (इलेक्ट्रीशियन, वायरमन, प्लंबर, मोटार मेकॅनिक, कोपा (पासा), आरेखक स्थापत्य, सर्व्हेअर, पंप ऑपरेटर कम मेकॅनिक, मेसन, रेडिऔलॉजी, पॅथॉलॉजी, माळी, मोटार मॅकेनिक व्हेईकल)

वरील शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष प्रशिक्षण कालावधीसाठी विद्यावेतनावर नेमणूका दिल्या जातात व त्यांचा प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर कार्यमुक्तकेले जाते.

ब) महानगरपालिकेमधील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे मुलभूत कामकाजविषयक असणारे विविध विषयांचे प्रशिक्षणासाठी विविध संस्थांकडून जी पत्र प्राप्त होतात त्यानुसार प्रशिक्षणासाठी नेमणूका केल्या जातात. तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत एल.एस.जी.डी., एल.जी.एस., फायनान्स मॅनेजमेंट यासारखे कर्मचा-यांचे शैक्षणिक अर्हता वाढविणारे कोर्सेस घेतले जातात. त्यासाठी नेमणूका केल्या जातात व शासन निर्णयानुसार अर्थिक व अन्य फायदे मंजूर केले जातात.

प्रशासन विभागामार्फत कोणत्याही अनुदानाचे वाटप करण्यात येत नाही.